**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादीचे वकिल श्री. एस.जी. कुळकर्णी यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**१७.** हे म्हणणे खरे नाही की मी माझी एमएच—३०—एबी—२८४१ टाटा एसीई ही मालवाहु ऑटो ही गाडी प्रतिवादीला दिनांक २७.०५.२०१५ रोजी केवळ रूपये २६,०००/— या मोबदल्यात विकली. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की त्या व्यतिरीक्त चोलामंडलम फायनान्स यांच्या ३५ किस्तांची भरणा करण्याची हमी प्रतिवादीने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर दिनांक ३०.०९.२०१५ रोजी मी प्रतिवादीच्या घरी आलो व त्यांना माझी गाडी परत मागितली व नाही दिली तर चोरीची केस दाखल करेल अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी प्रतिवादीने मला रूपये २६,०००/— व्याजासह परत कर मी तुला गाडी आणुन देतो असे म्हटले असता मी त्याला पाहुन घेण्याची व पोलीस स्टेशनद्वारे पैसे वसुल करण्याची धमकी प्रतिवादीला दिली.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०१.१०.२०१५ रोजी प्रतिवादीने मला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की मी सदर नोटीस मिळाल्यानंतर अद्यापपर्यंत प्रतिवादीला रूपये २६,०००/— ही रक्कम परत केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी प्रतिवादीविरूध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या रिपोर्टवरूनही प्रतिवादीविरूध्द काहीही कार्यवाही झाली नाही म्हणुन मी प्रतिवादीविरूध्द हा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की मी दाव्यात मागणी केलेली रूपये ३,५०,०००/— ही रक्कम प्रतिवादी मला व्याजासह देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादीकडुन पैसे उकळण्यासाठी हा खोटा दावा दाखल केला आहे व खोटा पुरावा देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. १७.०७.२०२५.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**